।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४१ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

साप्ताहिक माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३
RNI NO. MAH/MAR/2004/16467
POSTAL REGD. L2/RNP/PPR/04/2024-2026
FACEBOOK MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४२ वे नवीन वर्ष २२ वे | बुधवार दि ३० जुलै २०२५ (विशेष अंक) | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ३१ वा

# महूद येथे स्वतंत्र पोलिस स्टेशनची गरज

## वाढत्या चोरी, गुन्हेगारींवर आळा घालणे आवश्यक असल्याने ग्रामस्थांमधून मागणी




सांगोला : खून, चोऱ्या, व्यसनाधीनता,छेडछाड, वाहतूक कोंडी, वेश्याव्यवसाय, अंमली पदार्थांचा वापर व त्यातून वाढणारी गुन्हेगारी अशा एक ना अनेक प्रकारांमुळे महूद ग्रामस्थ त्रासलेले आहेत. अशा प्रकारच्या गुन्हेगारीवर वचक ठेवण्यासाठी महूद येथे स्वतंत्र पोलिस स्टेशन व्हावे, अशी मागणी येथील ग्रामस्थांमधून केली जात आहे.


पंढरपूर ते चिपळूण आणि जत ते मुंबई या मार्गावरील महूद हे चौकाचे ठिकाण आहे. सांगोला शहराच्या उत्तरेला सुमारे २२ कि.मी. अंतरावर असलेल्या महूद गावची लोकसंख्या सुमारे २५ हजार आहे. तसेच लहान-मोठी गावे व वाड्या-वस्ती मिळून सुमारे वीस गावांचा महूदशी दैनंदिन संपर्क असतो. येथील बाजारपेठ मोठी आहे. बँका, पतसंस्था यांच्यासह असंख्य आर्थिक संस्था येथे कार्यरत आहेत. मोठी विद्यार्थी संख्या असलेल्या अनेक शाळा व कॉलेज येथे आहेत. महूदपासून जवळच साखर कारखाना आहे. शिवाय महूद येथे स्वतंत्र पोलिस स्टेशन निर्माण होणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक अशी शासकीय जागा येथे उपलब्ध आहे. दळणवळणाच्या दृष्टीने महूद हे मोक्याचे ठिकाण असल्याने येथे तात्काळ पोलिस स्टेशन व्हावे, अशी मागणी ग्रामस्थांमधून करण्यात येत आहे. यासाठीचा प्रस्ताव सांगोला पोलिसांमार्फत राज्य शासनाला पाठविण्यात आला असल्याचे सांगण्यात येते.

पंढरपूर या तीर्थक्षेत्रापासून केवळ २४ कि.मी. अंतरावर हे गाव असल्याने वारीच्या काळासह वर्षभर कोकण, कराड, सातारा, सांगली या भागातील भाविकांची पंढरपूरला महूद येथून ये जा सुरु असते.सांगोल्याच्या एका टोकाला असलेल्या आणि इतर तीन तालुक्यांना जवळ असलेल्या महूद परिसरात गुन्हेगारीचे प्रमाण प्रचंड वाढलेले आहे. येथील मुख्य चौकापासून जवळ असलेल्या भर रस्त्यावर एका तरुणाची निघृण हत्या करण्यात आली. गेल्या वर्षभरापासून या परिसरात खुनाच्या अनेक घटना घडल्या आहेत. अंमली पदार्थांची खुलेआम विक्री येथे होत आहे.

गावाच्या विविध भागात अगदी गल्लीबोळातही गांजा मोठ्या प्रमाणावर विकला जात आहे. जिल्ह्यातील सर्वात मोठी अंमली पदार्थ विरोधी कारवाई याच परिसरात करण्यात आली होती. अनेक वेळा कारवाई होऊन पण अंमली पदार्थांची खुली विक्री येथे होत आहे. या व्यसनाधीनतेमुळे तरुण पिढी गुन्हेगारीकडे वळली जात आहे. त्यातून गुन्हेगारीचे प्रमाण वाढते आहे. शाळकरी मुलींना रोडरोमिओंचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी येथील शाळांनी यापूर्वी केली आहे. मात्र त्यावर कोणतीही कारवाई होताना दिसून येत नाही.येथील मुख्य चौकामध्ये प्रचंड वाहतूक कोंडी होत असून त्याला शिस्त लावण्याची गरज आहे. महूदचा आठवडा बाजार रस्त्यावरच भरत असल्यामुळे वाहतुकीच्या अनेक समस्या निर्माण होत आहेत. त्यामुळे अगदी मुख्य चौकात भीषण अपघात होऊन अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत.वारंवार चोरीचे प्रकार घडत आहेत.

महूदच्या विविध भागात वेश्याव्यवसाय सुरु असून यावर कोणतीही कारवाई होत नाही. यामुळे असा व्यवसाय करणाऱ्यांचे मनोबल वाढते आहे. महूदचा आठवडा बाजार हा चोरांसाठी पर्वणी ठरत आहे. मोबाईल व मोटारसायकल चोरीला जात आहेत. तसेच घरगुती, सामाजिक, राजकीय, धार्मिक अशा कार्यक्रमासाठी डी. जे. डॉल्बीचा अनिर्बंध वापर केला जातो. यामुळे सामान्य नागरिक, विद्यार्थी, वयोवृद्ध, लहान मुले, रुग्ण यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या वाद्यांवर पूर्णतः बंदी करावी, अशी मागणी होत आहे.

## स्व.आ.गणपतराव देशमुख यांच्या चतुर्थ पुण्यस्मरणानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन



सांगोला : सांगोला तालुक्याचे भाग्यविधाते स्व.आमदार डॉ. भाई गणपतराव देशमुख यांच्या चतुर्थ पुण्यस्मरणानिमित्त बुधवार दि.३० जुलै रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. स्व. आमदार गणपतराव देशमुख यांच्या पुण्यतिथीनिमित्त सांगोला येथील न्यू इंग्लिश स्कूल व विज्ञान महाविद्यालय येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

तसेच सूतगिरणी कार्यस्थळावर सकाळी १० ते १२ या वेळेत कर्जत येथील ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली पठाडे (महाराज) यांचे भजन, कीर्तन कार्यक्रम आयोजित केला असून दुपारी १२ वाजता पुष्पवृष्टी होणार आहे.

यावेळी रतनबाई देशमुख, पोपटराव देशमुख, चंद्रकांत देशमुख, आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख, डॉ. अनिकेत देशमुख यांची उपस्थिती असणार आहे.

तरी सर्व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन शेतकरी कामगार पक्ष व पुरोगामी युवक संघटनेकडून करण्यात आले आहे.

## सांगोला वनपरिक्षेत्र विभागाकडून मोठी कारवाई

### कडूलिंब जळावु लाकुड व चिंच जळावू लाकुड मालासह ट्रक जप्त

सांगोला : वनपरिक्षेत्र अधिकारी सांगोला, वनपाल जुनोनी व वनरक्षक ह. मंगेवाडी यांनी ह. मंगेवाडी नियत क्षेत्रात फिरती करत असताना दि.२६ जुलै २०२५ रोजी विनापरवाना कडूलिंब जळावु लाकुड व चिंच जळावू लाकुड वाहतूक करत असताना जप्त केला. जवळा ते हातीद रस्ता येथे फिरती करत असताना दि.२६.०७.२०२५ रोजी सायंकाळी वाहनाची तपासाणी केली असता ट्रक मध्ये कडूलिंब जळावु लाकुड व चिंच जळावू लाकुड विनापरवाना वाहतूक होत असल्याचे दिसुन आले.

वाहन चालक यांचेकडे वनविभागाचा वृक्षतोड परवाना व वाहतूक पास परवाना नसल्याचे दिसुन आले. पंचनामा, जबाब, कागदपत्रे केली. जप्त लाकूड माल अंदाजे १३ टन व किंमत अंदाजे ४०,०००/- होईल. दोन व्यक्तीवर वनरक्षक ह. मंगेवाडी यांनी प्रथम वनगुन्हा नोंद केला आहे. सदर लाकुड माल मालकी क्षेत्रातील पुढील तपास चालु आहे. सदरची कारवाई मा. मुख्य वनसंरक्षक (प्रा) पुणे-आशिष ठाकरे, तसेच मा. उपवनसंरक्षक, सोलापूर कुलराज सिंह व मा. सहा वनसंरक्षक (कॅम्पा), सोलापूर ए. बी. शिंदे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सदरची कारवाई तुकाराम विठ्ठल जाधवर वनपरिक्षेत्र अधिकारी सांगोला व एस. एल. वाघमोडे वनपाल जुनोनी, वनरक्षक ह. मंगेवाडी एस. व्ही. नराळे यांनी केली.

## निरा उजवा कालव्याचे पाणी फाटा क्र.५ ला सोडून चिंचोली तलाव पूर्ण क्षमतेने भरण्यात येणार- मा.आ.शहाजीबापू पाटील



सांगोला : राज्याचे जलसंपदा मंत्री नाम. राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे केलेल्या पाठपुराव्यामुळे निरा उजवा- कालवा फाटा क्र.५ ला २२५ क्युसेक्सने पाणी सोडण्यात आले असून येत्या पाच ते सहा दिवसात फाटा क्रमांक ५ च्या लाभ क्षेत्रातील शेवटच्या टोकापर्यतच्या गावाला पाणी पोहचणार आहे.

त्यानंतर चिंचोली तलाव पूर्ण क्षमतेने भरण्यात येणार असल्याची माहिती माजी आम.ॲड. शहाजीबापू पाटील यांनी दिली आहे. सध्या निरा व देवघर धरण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाऊस होत असून दोन्ही धरणातून पाण्याचा विसर्ग मोठ्या प्रमाणात सुरु आहे.

त्यामुळे निरा -उजवा कालव्यातून फाटा क्र ५ ला पाणी सोडण्यात यावे व चिंचोली तलाव पूर्ण क्षमतेने भरून देण्यात यावा अशी मागणी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली होती.

या मागणीची दखल घेत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे -पाटील यांनी तात्काळ फाटा क्रमांक ५ ला पाणी सोडून योजनेतील शेवटच्या गावापर्यंत पाणी सोडावे तसेच चिंचोली तलाव पूर्ण क्षमतेने भरून देण्याचे आदेश दिल्याने रविवार दि. २७ जुलैपासून फाटा क्र. ५ ला २२५ क्यूसेक्सने पाणी सोडण्यात आले आहे. चिंचोली तलाव पूर्ण क्षमतेने भरल्यानंतर लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे.

# कडलास नाका -एसटी स्टँड येथील दुभाजकावर उपायोजना करा अशोक कामटे संघटनेची मागणी

सांगोला : वासूद चौक ते कडलास नाका रस्ता दुभाजक येथे उपाय योजना तात्काळ करावी या मागणीचे निवेदन सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता यांना शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्यावतीने देण्यात आले आहे.

सांगोला शहरातील कडलास नाका ते वासूद चौक येथील रस्ता दुभाजकाची अनेक वर्षापासून दयनीय, दुरावस्था झाली आहे .रात्रीच्या वेळेस हे दुभाजक वाहनधारकांना दिसत नसल्याने अपघातांचे प्रमाण वाढले आहे, या दुभाजकावर कोणतीही रिफ्लेक्टर नाहीत व उंची कमी असल्याने वारंवार अपघाताच्या घटना घडत आहेत . प्रसंगी वाहनधारकांना आपला जीव धोक्यात घालून वाहने चालवावी लागत आहे, त्यामुळे मोठ्या अपघाताची शक्यता नाकारता येत नाही सार्वजनिक बांधकाम विभाग , नगरपरिषद सांगोला यांचे कडून या विभागाकडून ठिकाणी रिफ्लेक्टर, स्ट्रीट लाईट या ठिकाणी बसवून या दुभाजकाची उंची वाढवावी व आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात अशी मागणी अशोक कामटे संघटनेने केली आहे या निवेदनाच्या प्रती तहसीलदार, सांगोला, मुख्याधिकारी, नगरपरिषद सांगोला यांनाही देण्यात आले आहेत. हे दुभाजक असून अडचण नसून खोळंबा अशी विदारक परिस्थिती निर्माण



झाली आहे. या दुभाजकामध्ये दगड व कचऱ्यांचा ढीग साठत चालला आहे. किमान या दुभाजकामध्ये वृक्षारोपण तरी करावे त्यामुळे अपघाताचे प्रमाण कमी होईल अशी मागणी अशोक कामटे संघटनेने केली आहे.

सदरचा रस्ता पीडब्ल्यूडी विभागाकडे असल्याने या प्रश्न असा आहे की जबाबदारी कोण स्वीकारणार? सार्वजनिक बांधकाम विभाग, नगरपरिषद सांगोला व राष्ट्रीय महामार्ग यापैकी कोण लक्ष देणार ? आणि सर्वात महत्वाचं म्हणजे या दुभाजकामुळे होत असलेले दैनंदिन अपघात रोखण्याकरता संबंधित प्रशासनाने तत्काळ अंमलबजावणी करून उपाययोजना कराव्यात व या दुभाजकामध्ये वृक्षारोपण करावे , या समस्येमुळे संबंधित विभाग किती जणांचे बळी घेणार असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.अन्यथा मोठ्या अपघाताची शक्यता नाकारता येत नाही अशी मागणी सांगोलावासियातून होत आहे.

सांगोला परिसरात दुभाजकांमध्ये स्ट्रीटलाईट व इतर कामे करावयाची आहेत पण त्याकरिता आम्ही सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नाहरकत दाखला मागितला आहे तो प्रलंबित आहे मिळाल्यावर या दुभाजकावर सुशोभीकरण व स्ट्रीटलाईटची कामे सुरू करणार आहोत असे नगरपालिकेचे मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांनी अशोक कामटे संघटनेचे निवेदन देतेवेळी सांगितले.

सदरचा मार्ग राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे असल्याने या दुभाजक मार्गावरिल दुरुस्ती व इतर कामे करताना अडचणी येत आहेत पण हा मार्ग लवकरच सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरण झाल्यानंतर तात्काळ या दुभाजकाची समस्या व त्या अनुषंगाने दुरुस्तीची कार्यवाही करू असे बांधकाम विभागाचे उप अभियंता अशोक मुलगीर यांनी याप्रसंगी आश्वासन दिले.

# मद्यधुंद अवस्थेतील भरधाव ट्रेलर चालकाने दोन दुचाकीस मागून धडक देऊन उडवले, चार जण जखमी

सांगोला : मद्यधुंद अवस्थेतील भरधाव ट्रेलर चालकाने दोन दुचाकीस मागून धडक दिल्याने दुचाकी वरील चारजण जखमी झाल्याची घटना रविवारी दुपारी दीडच्या सुमारास सांगोला-कडलास रोडवर घडली आहे.

भारत नानासो बाबर (रा. डोंगरगाव ता. सांगोला) फिर्याद दिली. प्रवीण गोरख चव्हाण (रा. कोसारी, ता. जत, जि. सांगली) हा ट्रेलर (एमएच १२-एम व्ही ५४६३) घेऊन जतवरून सोनंद, कडलास मार्गे सांगोल्याकडे येत होता. पोपट नानासो बाबर (रा. डोंगरगाव) यांच्या दुचाकीस (एमएच ४५-जी ९५७७) कडलास ते सोनंद जाणारे रोडवरील पाण्याच्या कॅनॉलजवळ मागून धडक दिल्याने पोपट बाबर हे गंभीर जखमी झाले. पोपट बाबर यांना गंभीर जखमी अवस्थेत सांगोला येथील खासगी रुग्णालयात उपचार करून मिरज येथे हलविण्यात आले आहे. तर त्याच टेलरने कडलास रोडवरील माण नदीजवळ दुचाकीला (एमएच १०-वाय ७३०५) मागून धडक दिल्याने दुचाकीवरील अशरफ अल्लाबक्ष शेख, सिमरन अशरफ शेख, अफान अशरफ शेख (तिघेही रा. जत, जि. सांगली) यांना जखमी करून त्याचे वाहनाचे नुकसान केले आहे.

याबाबत भारत बाबर यांनी ट्रेलर चालक प्रवीण गोरख चव्हाण (रा. कोसारी, ता. जत) याने त्याच्या ताब्यातील वाहन हे हयगयीने, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून भरधाव वेगात चालवून अपघातास कारणीभूत ठरल्या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.


निर्भिड व सडेतोड बातम्या

नियमित वाचा...

साप्ताहिक माणदेश वार्ता


# श्रीनंद हॉस्पिटलच्या वतीने रानमळा प्राथमिक शाळेत लहान मुलांचे आरोग्य तपासणी शिबिर संपन्न



सांगोला : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रानमळा यलमार मंगेवाडी येथे शाळेमध्ये व अंगणवाडीच्या सर्व विद्यार्थ्यांचे महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व पंतप्रधान जन आरोग्य योजनेच्या वतीने श्रीनंद हॉस्पिटल सांगोला (डॉ.जानकर हॉस्पिटल) यांच्याकडून शाळेतील सर्व मुलांचे मोफत आरोग्य तपासणी औषध उपचार करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन यलमार मंगेवाडी गावचे सरपंच शितलताई भंडगे यांच्या हस्ते करण्यात आले. सदरच्या शिबिरासाठी सांगोला शहरातील सुप्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉक्टर राजेंद्र जानकर सर यांनी रुग्णांची तपासणी करुन हॉस्पिटल विषयी माहिती देऊन उत्तम सेवा देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. इयत्ता चौथी मधील विद्यार्थीनी कु.प्रिया सचिन खरात या छोट्या चिमुकलीने डॉ.राजेंद्र जानकर यांची मुलाखत घेतली. तिने वेगवेगळे प्रश्न डॉक्टरांना विचारून उपस्थित सर्वांना अचंबित केले. यावेळी डॉ.राजेंद्र जानकर यांनी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या वेगवेगळ्या प्रश्नांची उत्तरे देत मनमोकळेपणाने विद्यार्थ्यांशी संवाद साधला. सर्वांनी चांगला अभ्यास करावा,असे सांगत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी उद्योजक शशिकांत येलपले, शाळा समितीचे अध्यक्ष सुनील भंडगे, उपाध्यक्ष प्रियंका येलपले, सदस्या विद्या खरात, उज्वला बाबर, असिस्टंट डॉ.मृणाली कुलकर्णी, मुख्याध्यापिका शेवंता गायकवाड, रामचंद्र तंडे सर, उद्धव येलपले, सत्यवान जानकर, विजय मोरे, विकास शिंदे, अनिल कोकरे यांच्यासह अंगणवाडी सेविका, मदतनीस व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फॅबटेक मधील महेश खाटिक यांची एन झेड सोल्युशन कंपनीत निवड




सांगोला : फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च सांगोला महाविद्यालयातील आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स विभागात शिक्षण पुर्ण केलेले कुमार महेश खाटिक यांची एन झेड सोल्युशन प्रा. लि. कंपनीत कॅम्पस प्लेसमेंट मधुन निवड झाली.

एन झेड सोल्युशन प्रा. लि. कंपनी माहिती तंत्रज्ञान सेवा प्रदान करणारी कंपनी आहे. सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर विक्री सेवांचे जागतिक स्तरावर काम करणारी हि कंपनी आहे. या कंपनीची स्थापना २०१४ मध्ये नरेन झान्वर यांनी केली. विकास सेवांचे प्राविण्य देणारे कार्य हि कंपनी करते. अशा कंपनीत फॅबटेक कॉलेज मधील आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स इंजिनिअरिंग विभागातील महेश खाटिक यांची कॅम्पस प्लेसमेंट मधुन निवड झाली आहे.

महेश खाटिक यांची निवड झाल्याबद्दल फॅबटेक टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा श्रीमती नीलवर्णा बिरासाहेब रूपनर, उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर, सचिव डॉ. अमित रूपनर, कार्यकारी संचालक दिनेश रूपनर, इस्टेट डायरेक्टर डॉ. संजय आदाटे, व्यवस्थापक प्रतिनिधी प्रा. प्राजक्ता रूपनर, प्राचार्य डॉ. रविंद्र शेंडगे, उपप्राचार्या डॉ. विद्याराणी क्षीरसागर, ट्रेनिंग अॅण्ड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. धनंजय शिवपुजे, आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स विभाग प्रमुख डॉ. सोमनाथ ठिंगळे आदींसह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# कै.डॉ.भाई गणपतराव देशमुख यांच्या पुण्यतिथी निमित्त डॉ.विजय बंडगर यांच्या यशोदा हॉस्पीटलकडून मोफत स्त्रीरोग व प्रसुती शिबिराचे आयोजन



सांगोला : सांगोला तालुक्याचे भाग्यविधाते कै.डॉ.भाई गणपतराव देशमुख यांच्या चौथ्या पुण्यतिथी निमित्ताने प्रसिध्द स्त्रीरोगतज्ञ, प्रसुती व सोनोग्राफी तज्ञ डॉ.विजय बंडगर यांच्या यशोदा हॉस्पीटलकडून मोफत स्त्री रोग व प्रसूती शिबिराचे आयोजन ३० जुलै रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत यशोदा हॉस्पिटल मॅटर्निटी, गायनॅक, सर्जिकल वाढेगाव नाक्याजवळ सांगोला येथे आयोजन करण्यात आले आहे.शिबिराचे उद्घाटन आ.डॉ.भाई.बाबासाहेब देशमुख यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे.

. शिबिरासाठी पूर्व नोंदणी व नाव देणे आवश्यक असून या दिवशी होणाऱ्या सोनोग्राफी ,बाळंतपण किंवा इतर शस्त्रक्रियेमध्ये सवलत देण्यात येणार आहे. तरी सांगोला तालुक्यातील गरजू महिला रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ. विजय बंडगर यांच्याकडून करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९२ ८४ ३२ २० ७२ या नंबर वरती संपर्क साधावा.


साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com

संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४२ वे अंक-३५ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# श्री छत्रपती शिवाजी विद्यामंदिर धायटी प्रशालेत विविध क्षेत्रांमध्ये प्राविण्य मिळवलेल्या माजी विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न

सांगोला : श्री छत्रपती शिवाजी विद्यामंदिर धायटी प्रशालेत शनिवार दिनांक २६ जुलै २०२५ रोजी प्रशालेतील माजी विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांमध्ये मिळविलेल्या प्राविण्याबद्दल सत्कार समारंभ आयोजित करण्यात आलेला होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे मार्गदर्शक व सेवानिवृत्त आय.एफ.एस. अधिकारी श्री माणिक भोसले होते. श्रीराम क्रीडा व शिक्षण प्रसारक मंडळ धायटी संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर शिवराज भोसले यांचे शुभ हस्ते सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी प्रशालेचे माजी मुख्याध्यापक श्री मनोहर इंगवले सर उपस्थित होते.

सुरुवातीस संस्थेचे संस्थापक स्वर्गीय रामदास भोसले गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. तदनंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री माणिक नाना भोसले यांना सूर्योदय फाउंडेशन यांचेकडून जीवनगौरव पुरस्कार मिळाले बद्दल प्रशालेचे मुख्याध्यापक श्री विजयकुमार जगताप सर यांचेकडून त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच डॉ. शिवराज भोसले, श्री मनोहर इंगवले यांचाही सन्मान करण्यात आला.

त्यानंतर एमपीएससी परीक्षेमधून सहाय्यक गटविकास अधिकारी पदावर नियुक्ती झालेले श्री रविकांत चंद्रकांत पाटील यांचा सन्मान मानाची शाल , मानाची टोपी पुष्पगुच्छ श्यामची आई पुस्तक देऊन करण्यात आला यावेळी त्यांचे माता पिता ही उपस्थित होते त्यांचाही सन्मान करण्यात आला. तदनंतर डॉक्टर रवी भोसले बालरोग तज्ञ शितल शहा हॉस्पिटल पंढरपूर तसेच डॉक्टर धनाजी जगताप बालरोग तज्ञ गोदावरी हॉस्पिटल सांगोला, श्री.राजेंद्र फाटे, श्री सोमनाथ शिनगारे, श्री संतोष मोरे, श्री निलेश भोसले, श्री गणेश कांबळे, श्री अजित पवार, श्री संतोष भोसले, श्री प्रकाश



फाटे, ॲड.ऋतुजा भोसले, श्रीमती अश्विनी जगताप मॅडम या सर्व विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असणाऱ्या प्रशालेच्या माजी विद्यार्थ्यांचा सन्मान मानाची शाल, मानाची टोपी, पुष्पगुच्छ गुलाब पुष्प व श्यामचे आई पुस्तक देऊन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

अध्यक्ष मनोगत व्यक्त करताना श्री माणिक भोसले यांनी सर्वांना मनापासून शुभेच्छा दिल्या तसेच निवडलेल्या क्षेत्रांमध्ये प्रामाणिकपणे काम करा. कार्यालय कुठलेही असो दररोजचे काम दररोज करा. झिरो पेंडन्सी काम करा. सामान्य नागरिकांच्या काय व्यथा आहेत याची जाणीव मनामध्ये कायम ठेवा. आरोग्य सांभाळा. शिक्षणाचे कौशल्य वापरून आपली सेवा चांगली करा. ऑफिसमध्ये सलोख्याचे वातावरण कायम ठेवा असा मोलाचा संदेश सर्वांना दिला. संस्थेचे अध्यक्ष डॉ.शिवराज भोसले यांनीही उपस्थित सर्वांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

सत्कारमूर्ती विद्यार्थ्यांमधूनही डॉ. धनाजी जगताप, आरटीओ पदावर कार्यरत असणारे श्री अजित पवार, डॉ. रवी भोसले, मेजर श्री संतोष भोसले, कुमारी गौरी भोसले, श्री राजेंद्र फाटे ,असिस्टंट बी.डी.ओ. श्री रविकांत पाटील या सर्वांनी आपली मनोगते व्यक्त केली. यावेळी श्रीराम क्रीडा व शिक्षण प्रसारक मंडळ धायटी संस्थेचे सचिव श्री संजय भोसले सर, प्रशालेचे मुख्याध्यापक श्री विजयकुमार जगताप सर, सर्व शिक्षक, शिक्षिका, कर्मचारी उपस्थित होते.

सूत्रसंचालन सहशिक्षक श्री सुनील लिगाडे सर यांनी केले तर आभार सहशिक्षक श्री केशव मोरे सर यांनी मानले.

# लोटेवाडी ग्रामपंचायत सरपंच पदी शिवसेनेच्या सौ.नकुशा लवटे यांची बिनविरोध निवड

सांगोला : लोटेवाडी ग्रामपंचायतच्या ओबीसी सर्वसाधारण प्रवर्गासाठी नुकताच दिपाली प्रकाश लवटे यांनी राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या जागेवर सौ नकुशा मधुकर लवटे यांची बिनविरोध निवड झाली.

यावेळी शिवसेना मा.आ.शहाजीबापू पाटील व श्री उत्तम दादा खांडेकर यांच्या पॅनलच्या ७ सदस्यांनी उपस्थिती दाखवली. विरोधात कोणताही अर्ज न आल्याने व बाकीचे सर्व सदस्य अनुपस्थित राहिल्याने नकुशा मधुकर लवटे यांची बिनविरोध निवड झाली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मंडल अधिकारी विकास जाधव, तलाठी, ग्रामसेवक समाधान आदाटे उपस्थित होते. यावेळी पोलीस श्री.झोळ, श्री ढेरे यांनी चोख बंदोबस्त पार पाडला.

यावेळी माजी सरपंच नामदेव लवटे, हिराबाई सरगर, दिपाली लवटे, विजय खांडेकर, सत्यवान देशमुख, शांताबाई चव्हाण या सदस्यांसह विविध का सेवा सोसायटीचे चेअरमन सागर लवटे , व्हा.चेअरमन सुनील देशमुख, सर्व संचालक, तसेच शिवसेना तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे, आबासाहेब माने, राजू हजारे, बिरुदेव हजारे, चैतन्य जावीर, ऋषिकेश गवळी, देवदास लवटे, भगवान शेंबडे ,अगतराव देशमुख, प्रकाश देशमुख, तानाजी सरगर, सुरेश सावंत, अण्णा मोरे, नीरज ढेरे, विलास विभुते, सदाशिव सावंत, अनिरुद्ध गवळी, पांडुरंग मोटे, अशोक सातपुते, दादासाहेब सातपुते, बापूसाहेब लवटे, नवनाथ कुंभार, गणेश कोळेकर, शशिकांत लवटे सर, ज्ञानू माऊली लवटे, पतसंस्थेचे चेअरमन सुधाकर लवटे, संतोष कोळेकर, बाळाराम लवटे, रमेश लवटे, विक्रम सातपुते, भीमराव लवटे, माणिक काटे, शहाजी देशमुख, आप्पा सरगर, बाबुराव मोरे, विठ्ठल पवार, पं स.सदस्य रूपाली लवटे,आदी ग्रामस्थ महिलावर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# सांगोला शहरातील नगर प्रदक्षिणामार्गावर असणारे खड्डे मुजवावेत; भाविकांची मागणी

सांगोला : सांगोला शहरातील कोष्टी गल्ली येथील विठ्ठल मंदिरापासून प्रतिवर्षी श्रावण महिन्यात दररोज सकाळी विठ्ठल नामघोषांमध्ये शहर प्रदक्षिणाची दिंडी निघत असते या नगर प्रदक्षिणा मार्गावर असणारे खड्डे त्वरीत मुजवावेत, अशी मागणी निवेदनाद्वारे मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांचेकडे करण्यात आली आहे.

कोष्टी गल्लीतील विठ्ठल मंदिरापासून प्रतिवर्षी श्रावण महिन्यात दररोज सकाळी विठ्ठल नामघोषांमध्ये शहर प्रदक्षिणाची दिंडी निघत असते. दिंडीतील भाविक अनवाणी चालत असतात, दिंडीची सुरुवात कोष्टी गल्ली विठ्ठल मंदिर येथून होऊन ती मेन रोड, मणेरी चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, सावरकर पथ, मारुती मंदिर, मणेरी गल्ली, परीट गल्ली, महादेव गल्ली, डबीर चौक, काझी गल्ली आदी ठिकाणावरून विठ्ठल मंदिरात समाप्ती होत असते यावर्षी शहरातील भूमिगत गटारीचे कामामुळे या मार्गावर बरेच ठिकाणी खड्डे पडले असून यामध्ये पावसाचे पाणी साचून चिखल मोठ्या प्रमाणात साचत आहे, यामुळे नगर प्रदक्षिणा दिंडीमधील भाविकांना चालण्यास अडथळा होत आहे. तसेच वयोवृद्ध भाविक घसरत आहेत.



तरी नगर प्रदक्षिणा मार्गावर बारीक मुरूम टाकून भाविकांची सोय करावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदनावर ६३ भाविक भक्तांच्या स्वाक्षरी असून सदर निवेदनाची प्रत आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनाही देण्यात आली आहे.

# प्रा.डॉ.प्रकाश बनसोडे यांच्या कॅन्सर वरील प्रोजेक्टला रिसर्च इनोवेशन अवॉर्ड प्राप्त



सांगोला : वेल्लोर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आंध्र प्रदेश युनिव्हर्सिटी, आंध्र प्रदेश व अमेरिकन केमिकल सोसायटी (ए.सी.एस.) या नामांकित संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय स्तरावरील केमिस्ट्री इनोवेशन चॅलेंज केम स्पार्क २०२५ ही संशोधन प्रकल्प स्पर्धा नुकतीच रोजी संपन्न झाली होती. सदर स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. या स्पर्धेमध्ये सांगोला महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातील प्राध्यापक व कॅन्सर संशोधक प्रा. डॉ. प्रकाश अरुण बनसोडे यांनी सहभागी होऊन फेरोसिन लेबल्ड मॉलिक्युल्स ॲंड देअर ॲंटी कॅन्सर इव्हॅल्युएशन या त्यांच्या संशोधन प्रकल्पाचे सादरीकरण केले. सदर संशोधन प्रकल्पास स्पर्धेतील तज्ञ समितीच्या वतीने द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक रोख रक्कम व प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले.

सदर संशोधन प्रकल्पामध्ये डॉ. बनसोडे यांनी रसायनशास्त्र प्रयोगशाळेत निर्मिती केलेल्या फेरोसिन संयुगांची कॅन्सर वरील औषधे बनविण्यासाठीची उपयुक्तता, जागतिक बाजारपेठेतील मागणी व व्यापारीकरण आराखडा याबाबतची अभ्यासपूर्ण मांडणी केली. सदर संशोधन प्रकल्प स्पर्धेमध्ये देशातील विविध राज्यातील संशोधकांकडून ऊर्जा, औषध निर्मिती, पर्यावरण, पाणी प्रक्रिया, विद्युत रसायनशास्त्र, पॉलिमर रसायनशास्त्र, नॅनो तंत्रज्ञान, जीव तंत्रज्ञान अशा विविध विषयावरील संशोधन प्रकल्प सादर करण्यात आले.

प्रा. डॉ. प्रकाश बनसोडे हे सांगोला महाविद्यालयामध्ये रसायनशास्त्र विभागात प्राध्यापक पदावर कार्यरत असून त्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची रसायनशास्त्र विषयातील पीएच.डी. मार्गदर्शक मान्यता प्राप्त आहे.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली आठ विद्यार्थी पीएच.डी.चे संशोधन पूर्ण करीत आहेत. तसेच ते सांगोला महाविद्यालयाच्या संशोधन व विकास विभागाचे संचालक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी बौद्धिक संपदा कायदा, पेटंट्स व कॅन्सर जागरूकता याविषयी महाराष्ट्रातील विविध विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये पार पडलेल्या संशोधन परिषदा व कार्यशाळा मधून मार्गदर्शनपर व्याख्याने दिली आहेत. त्यांच्या यशाबद्दल त्यांचे समाजाच्या सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.


आमचे श्रध्दास्थान
महाराष्ट्राच्या राजकारणातील
भिष्मपितामह...
स्व.मा.डॉ.गणपतरावजी देशमुख
यांचे चौथे पुण्यस्मरण
बुधवार दि.३०/०७/२०२५
“श्रध्देची अन निष्ठेची तुम्ही गुंफली फुले प्रतिष्ठा आम्हास लाभे
केवळ तुमच्यामुळे कष्टातून तुम्ही उभा केला,
हा सर्व पसारा उद्योगाच्या नभात वाटे झाला उज्वल तारा..”
चौथ्या पुण्यस्मरण
दिनानिमित्त
विनम्रअभिवादन..!
अभिवादक - माजी नगराध्यक्ष : श्री.मारुती(आबा) तुळशीराम बनकर व श्री.बाळासाहेब महादेव एरंडे(उद्योगपती,सांगोला)